# प्रेसनोट

दि.०४/१२/२०२१

## लोणीकाळभोर येथील वाहतुक शाखेच्या पोलीस अंमलदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - २७ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – सुहास भास्कर हजारे, वय - ३५ वर्षे,<br>पद - पोलीस शिपाई, वाहतूक शाखा, लोणीकाळभोर, पुणे शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,०००/- (सहा हजार रूपये)<br>तडजोडीअंती ५,०००/- (पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- ०३/१२/२०२१
सापळा दिनांक :- ०४/१२/२०२१
ठिकाण:- कवडीपाट, लोणीकाळभोर टोलनाक्याजवळ

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार ट्रॅव्हल्स एजन्सीमध्ये मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांच्या एजन्सीच्या बसेस स्वारगेट पुणे ते सोलापूर असे प्रवासी वाहतूक करतात. तक्रारदार यांच्या ट्रॅव्हल्सच्या बसेसवर कारवाई न करण्यासाठी दर महिना ६,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची दिनांक ०३/१२/२०२१ रोजी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक याने तक्रारदार यांच्या टॅव्हल्स एजन्सीच्या बसेसवर कारवाई न करण्यासाठी प्रतिमहिना ६,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/- हजार रूपये मागणी केली व आज दिनांक ०४/१२/२०२१ रोजी लोणीकाळभोर येथील टोलनाक्याजवळ ५,०००/- रूपये लाच रक्कम स्वीकारल्यावर ताब्यात घेण्यात आले असून लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक अलका सरग या तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.